# कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे महिला किसान दिवस संपन्न

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, धुळे आणि कृषी विज्ञान केंद्र, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय महिला किसान दिनाच्या निमित्ताने महिला कृषी उद्योजकता विकास अंतर्गत दुग्ध व्यवसाय व आवळा प्रक्रिया उद्योग या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

सध्याच्या कोरोना (Covid-१९) परिस्थितीमध्ये प्रत्यक्ष केंद्रावर प्रशिक्षण घेणे शक्य नसल्याने इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या माध्यमातून झूम अँप द्वारे सदर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

उदघाटन प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन करतांना महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीचे संचालक, विस्तार शिक्षण तथा संशोधन मा. डॉ. शरद गडाख म्हणाले कि, इतर क्षेत्रांप्रमाणे महिलांचे शेती क्षेत्रातील योगदान आणि महत्व अनन्य साधारण आहे. कृषी क्षेत्रातील प्रमुख शक्ती स्त्री शक्ती असल्यामुळे त्या घेत असलेल्या श्रमांची जाणीव ठेवून त्यांना महत्त्व देऊन त्यांचे सबलीकरण करणे महत्त्वाचे आहे. सीड बँक जननी श्रीमती राहीबाई पोफरे, कृषी उद्योजिका स्वाती शिंगाडे यांच्यासारख्याच कर्तुत्ववान महिलांचे उदाहरण देऊन त्यांनी महिलांचे मनोबल वाढविले तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी ने शिफारस केलेली एकात्मिक शेती पद्धती ज्यामध्ये प्रक्रिया उद्योग आणि दुग्धव्यवसायाला अधिक महत्त्व आहे अशा पद्धती आत्मसात करायला हव्यात असे आवाहन केले.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीचे अधिष्ठाता(कृषी) व संचालक शिक्षण, मा.डॉ. अशोक फरांदे आपल्या मनोगतात म्हणाले कि, ग्रामीण भागातील ८० टक्के पेक्षा अधिक महिला या शेतीमध्ये कार्यरत आहेत. कृषक महिला ज्ञानी आणि कुशल आहेत. अर्थार्जनासाठी त्या कुटुंबाचा कणा होऊन भक्कमपणे उभ्या आहेत. भारतीय शेतीचा चेहरामोहरा बदलायचा असेल तर महिलांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे आणि त्यासाठी अशा प्रकारचे ‘‘दिन’’ साजरा होणे आवश्यक आहे.

कार्यक्रमास उपस्थित असलेले कृषी महाविद्यालय, धुळेचे सहयोगी अधिष्ठाता, मा. डॉ. चिंतामणी देवकर आपल्या मार्गदर्शनात म्हणाले कि, कृषी विज्ञान केंद्र धुळे आणि कृषी महाविद्यालय धुळे हे नेहमी एकत्र येऊन शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवित असते. प्रामुख्याने covid-19 Lockdown मध्ये ज्या वेबिनार शृंखलेचे आयोजन करण्यात आले त्यातील ५० वे प्रशिक्षण आज ‘‘राष्ट्रीय महिला किसान’’ दिनाच्या दिवशी संपन्न झाले. त्याबाबत सर्व शास्त्रज्ञांचे त्यांनी अभिनंदन केले.

कृषी विज्ञान केंद्र, धुळे चे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे यांनी आपल्या प्रस्तावनेतून कृषी विज्ञान केंद्र धुळे महिलांसाठी राबवित असलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. कृषी उद्योजकतेच्या माध्यमातून महिला आत्मनिर्भर होणे सहज शक्य असल्याचे ते म्हणाले. यासाठी विविध महिला यशोगाथा यांचा संदर्भ देऊन त्यांनी सहभागी महिलांना प्रोत्साहित केले. नव्याने येऊ पाहणाऱ्या स्टार्ट- अप संकल्पनेबाबत ओळख करून त्यातील

संधींबाबत महिला व युवकांना मार्गदर्शन केले. उद्योजकते मध्ये पणन व्यवस्था समजावून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. बचत गट पातळीवर डाळिंब सरबत  प्रक्रिया, घरपोच भाजीपाला विपणन प्रणाली इत्यादींबाबत त्यांनी मार्गदर्शन केले

कृषी विज्ञान केंद्र, धुळे च्या विषय विशेषज्ञ, अमृता राऊत यांनी आवळा प्रक्रिया व त्या उद्योगातील संधी तसेच  विषय विशेषज्ञ, डॉ. धनराज चौधरी, यांनी दुग्ध व्यवसाय  व त्या उद्योगातील संधी  या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील प्रसारण अधिकारी डॉ. पंडित खर्डे तसेच विभागीय विस्तार केंद्र धुळे येथील डॉ. मुरलीधर महाजन हे देखील उपस्थित होते.

कृषि  विज्ञान केंद्राचे डॉ. पंकज पाटील  यांनी आभारप्रदर्शन केले तर डॉ. धनराज चौधरी यांनी सूत्रसंचान केले.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषि  विज्ञान केंद्राचे श्री. जगदीश काथेपुरी, श्री. रोहित कडू,  डॉ. अतिश पाटील,  सौ. प्राची काळे,  सौ. स्वप्नाली कौटे,  श्री. स्वप्नील महाजन,  श्री. जयराम गावित,  श्री. बाळू वाघ,  श्री. रमेश शिंदे,  श्री. कुमार भोये,  श्री. मधुसूदन अहिरे,  श्री. यशवंत मासुळे,  श्री. जीवन राणे यांचे विशेष सहकार्य लाभले.



महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीचे संचालक, विस्तार शिक्षण तथा संशोधन मा. डॉ. शरद गडाख उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना